| CNR NO:MHGO030108212025 | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ९२४७/२०२५ | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | :- | १२.११.२०२५. | | |
| नोंदणी तारीख | :- | १२.११.२०२५. | | |
| निकाल तारीख | :- | १२.०८.२०२६ | | |
| कालावधी | :- | वर्ष | महिना | दिवस |
| | | ०० | ०९ | ०० |
| निशानी क्रमांक | :- | ६ च्या खाली | | |

**फॉर्म क्रमांक ३२**
**भाग अ**
**न्यायनिर्णय**

[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (I)]

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्रमांक ४), गोंदिया, ता. गोंदिया, जिल्हा – गोंदिया यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी वैभव ह. शेंडे)

**न्यायनिर्णय**
( पारीत दिनांक १२.०८.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९२४७/२०२५.**
**महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन, रावणवाडी विरूध्द मनोज भजनलाल आंबेडारे.**
**अपराध क्रमांक ५३१/२०२५.**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन रावणवाडी ता. जिल्हा – गोंदिया. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | **श्री. ए. जी. येडे,** विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **मनोज भजनलाल आंबेडारे,**<br>वय –४२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – कन्हारटोला (लहिटोला),<br>ता. जि. गोंदिया. |
| आरोपीतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधीज्ञ कु. एस. टी. रोकडे.** |

**भाग ब**
**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १८.१०.२०२५. |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १८.१०.२०२५. |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १२.११.२०२५. |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १२.०१.२०२६. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०९.०३.२०२६. |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | १२.०८.२०२६. |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

**आरोपीचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा /सुचना पत्र दिल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | भा.ना.सु. सं. चे कलम ४६८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मनोज भजनलाल आंबेडारे** | सुचना पत्रावर सोडले. | १२.०१. २०२६. | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई). | आरोपीची निर्दोष मुक्तता. | लागु नाही. | लागु नाही. |

# न्यायनिर्णय
## (पारीत दिनांक १२.०८.२०२६)

सदरचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५– ई नुसार चालविण्यात आला.

२. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीचे विद्वान वकील यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिवाडा करण्याकरीता माझ्या पुढे उद्भवले. त्यांचे सकारण निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे. | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | दिनांक १८.१०.२०२५ रोजी सायंकाळी ०५.१५ ते ०५.४५ वाजताचे दरम्यान मौजा कन्हारटोला, ता. जि. गोंदिया येथे आरोपी हा ०७ लिटर हातभट्टी दारु किंमत रुपये १,४००/– चा मुद्देमाल विना परवाना व अवैधरीत्या बाळगतांना आढळुन आला व त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५–ई प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता –**

३. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्रमांक १ – ताराचंद (नि.क्र.६ पुढे) याची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर निशाणी क्रमांक १ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीविरुध्द कुठलाही पुरावा अभिलेखावर दाखल नसल्यामुळे

आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा अधिनियम कलम ३५१ (१)(ब) अन्वये निदेवन नोंदविण्यात आले नाही. दोन्ही पक्षातर्फे युक्तीवाद ऐकला.

४. अभियोग साक्षीदार क्रमांक १ – ताराचंद (नि.क्र.६ पुढे) याने त्याच्या पुराव्यादरम्यान पोलीसांनी त्याला घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकरीता बोलाविले नसल्याचे सांगीतले. तसेच त्याच्यासमक्ष कोणत्याही प्रकारचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा झाला नसल्याचे सांगीतले. अभियोग पक्षाला सदर साक्षीदार मदत करत नसल्याकारणाने भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ नुसार सुचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे सर्व सुचक प्रश्न नाकारले. त्यामुळे या पंच साक्षीदाराकडुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा संशयापलीकडे सिध्द होत नाही. अभियोग पक्ष वरील पंच साक्षीदाराकडुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करुन घेण्यास अपयशी ठरले.

५. वरील पंच साक्षीदाराच्या साक्षपुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर पंच साक्षीदारासमक्ष कोणत्याही प्रकारचा पंचनामा केला नाही. पंच साक्षीदाराच्या सरतपासामध्ये पोलीसांनी त्याच्यासमक्ष कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे सांगीतले आहे. यावरुन असे दिसुन येते की, पोलीसांनी सदर पंचनामा स्वतंत्र पंच साक्षीदारासमक्ष तयार केले नाही. त्यामुळे सदर संशयाचा फायदा आरोपीस देणे न्यायनिर्देशीत आहे.

६. अभियोग पक्षाने द्रव्याबाबतचे रासायनिक परिक्षण अहवाल दाखल करण्यात केलेला नाही. त्यामुळे सदर द्रव्य हे आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले होते ही बाब सिध्द होत नाही. अभिलेखावर असलेल्या पुराव्याच्या आधारे असे निष्पन्न होते की, पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी ही पुर्णपणे अभियोग पक्षावर असते. अभियोग पक्ष हा घटनास्थळ व जप्ती

पंचनामा सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरला आहे. फिर्यादी तसेच इतर साक्षीदारांना वारंवार संधी देवून सुध्दा अभियोग पक्षाने त्यांना तपासले नाही. आरोपीविरुध्दची फिर्याद ही सिध्द होवू शकली नाही. या कारणास्तव अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५– ई नुसारचा गुन्हा सिध्द झाला नाही. **म्हणुन, सदर न्यायालय मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u> –

७. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा सबळ, विश्वसनीय, पुरेसा व शंकेच्या पलीकडचा पुरावा सादर केला नाही. अभियोग पक्ष आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करु शकले नाही. त्यामुळे सदर खटल्यातुन आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य होईल, असे दिसुन येते. जप्त मुद्देमाल ०७ लिटर हातभट्टी दारु ही मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांचेकडे योग्य विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावा. **सदर न्यायालय मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## <u>आदेश</u>

१. आरोपी नामे मनोज भजनलाल आंबेडारे, वय –४२ वर्ष, व्यवसाय – मजुरी, राहणार – कन्हारटोला (लहिटोला), ता. जि. गोंदिया याची महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५– ई अन्वयेच्या गुन्ह्यातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येते.

**३.** जप्त मुद्देमाल ०७ लिटर हातभट्टी दारु ही मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांचेकडे योग्य विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावा.

**४.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेकामी रुपये १५,०००/– (अक्षरी पंधरा हजार फक्त) चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन कदबा दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).**

Digitally signed by VAIBHAV HARISHRAO SHENDE
Date: 2026.08.12 16:58:08 +0530

**दिनांकः १२.०८.२०२६.**
**गोंदिया.**

**(वैभव ह. शेंडे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**(**न्यायालय क्रमांक ४**),** गोंदिया**.**

संं. फौ. ख. क्र. १२४७/२०२५.
शासन वि. मनोज भजनलाल आंबेडारे.
न्यायनिर्णय (नि.क्र.६ च्या खाली)

## भाग क
## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (iii)]
## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

**अ. अभियोग :–**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | ताराचंद भैय्यालाल नागपुरे. (नि.क्र.६ पुढे) | घटनास्थळ व जप्ती पंच |

**ब. बचाव साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

संं. फौ. ख. क्र. ९२४७/२०२५.
शासन वि. मनोज भजनलाल आंबेडारे.
न्यायनिर्णय (नि.क्र.६ च्या खाली)

## अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

**अ. अभियोग :-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. बचाव :-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :-**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAIBHAV HARISHRAO SHENDE
Date: 2026.08.12 16:58:14 +0530

दिनांकः १२.०८.२०२६.
गोंदिया.

(वैभव ह. शेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्रमांक ४), गोंदिया.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S. S. Borkar,** |
| Name of Court | : | 4th Jt. Civil and Criminal Court, Gondia. |
| Judgment dictated on | : | 12.08.2026. |
| Transcript ready on | : | 12.08.2026. |
| Judgment Signed by Presiding Officer on | : | 12.08.2026. |
| Judgment uploaded on | : | 12.08.2026. |